
पुण्य नगरी

श्रीधर लाड आलेगाव

# माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांची पुण्यतिथी

अकोला, दि. २७ (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील मूर्तिजापूर येथील व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूल तसेच आलेगाव येथील नूतन विद्यालयामध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांची पुण्यतिथी कार्यक्रम पार पडला.





## मूर्तिजापूर

### व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूल

व्यंकटनाथ महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूलमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ तथा मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची पुण्यतिथी कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष प्रा. अवधूत हेरे, पर्यवेक्षिका मीनाक्षी महाजन व वंदना खोंडे यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थिनी माही उंबरकर तसेच शिक्षिका वैष्णवी दुबे यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर प्रकाश टाकत देशाच्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या साधेपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रप्रेम आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या प्रेमातून प्रत्येकाने प्रेरणा घ्यावी, असे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांनी डॉ. कलाम यांच्या जीवनाविषयी सविस्तर माहिती दिली. विचारांचा आणि कार्यांचा विद्यार्थ्यांनी आदर्श घेऊन देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार वैष्णवी काळे यांनी मानले. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## आलेगाव

### नूतन विद्यालय

आलेगाव येथील नूतन विद्यालय आलेगाव येथे दिनांक २८ जुलै रोजी डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचा पुण्यतिथी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवर व शिक्षकांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार नवरखान, श्रीधर लाड तसेच विद्यालयाचे प्राचार्य वसंत राठोड, पर्यवेक्षक माळी तसेच सायबर मार्गदर्शक म्हणून अकोला खंडेलवाल महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कुमारी साक्षी फाटकर व हर्षा बिहाडे आदी मंचकावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये शिक्षक सरप यांनी विद्यार्थ्यांना डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनाचे फार सुंदर प्रसंग समजावून सांगून शिक्षणासह सर्वांगीण विकास आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व किती महत्त्वाचे आहे हे स्पष्ट करून सांगितले.

तद्नंतर सायबर मार्गदर्शन अंतर्गत साक्षी फाटकर व हर्षा बिहाडे यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल वापरत असताना तसेच त्यांचे पालक मोबाईल वापरत असताना ते या सायबर गुन्ह्यामध्ये अडकू नये याकरता विविध सायबर गुन्ह्यांबद्दल तसेच जागरूकता निर्माण करण्यासंदर्भात रोचक माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. तसेच मुलींच्या बाबतीत सुद्धा मोबाईल वापरण्यासंदर्भात काटेकोरपणे नियमांचे पालन कसे करावे आणि हॅकर पासून कसे सावध राहावे या बाबतचे सर्व गंभीर बाबी विद्यार्थिनींना समजावून सांगितले.

कार्यक्रमाचे संचालक नूतन विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी केले. या कार्यक्रमाकरिता नूतन विद्यालय आलेगाव तसेच गुरु गणेश मिश्री जैन कनिष्ठ व सीनियर कॉलेजचे सर्व विद्यार्थी व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

Akola Edition
Jul 28, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com